**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम)**
**वखार केंद्र - फलटण**
**फलटण — लोणंद रोड, तांबमाळ, फरांदवाडी, ता. फलटण जि. सातारा**
**Email id : phaltan.wh@mswc.in मो. ९०९६९७८९७०**

## निविदा अर्ज

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हा महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असून, राज्यभरात गोदामांचे जाळे निर्माण करून प्रामुख्याने शेतमाल साठवणुकीची सुविधा पुरविण्यासाठी या महामंडळाची निर्मिती झाली आहे. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ ८ ऑगस्ट १९५७ रोजी“ॲग्रिकल्चर प्रोडयुस कॉर्पोरेशन ॲक्ट १९५६” अन्वये स्थापन झाले असून १९६० च्या अधिनियमाद्वारे कामकाज होत आहे.

“मुंबई वेअरहाउस ॲक्ट १९६० १६(१)” १९६०कायदयानुसार जेव्हा जेव्हा गोदामांत साठवलेल्या मालाची दिर्घ कालावधीमुळे मालाची प्रत खालावयाची शक्यता असते त्यावेळी गोदाम प्रमुख ताबडतोब ठेवीदारास माल घेवून जाणेबाबत नोटीस देतो व पावती योग्य रीतीने सोडवून ताबडतोब वस्तू ताब्यात घेण्यास सांगतो. ठेवीदाराने योग्य वेळी नोटिसांचे पालन केले नाही तर गोदाम मालक अशा वस्तू ठेवीदाराच्या किंमती आणि जोखमीवर सार्वजनिक लिलावाने विक्री करू शकतात व साठवणूक भाडे वसुल करू शकतात.

**<u>जुना साठा तपशील</u>**

**वखार केंद्राचे नाव — फलटण**

| अ.क्र. | मालाचे नाव | साठविलेल्या साठयाचा तपशील | |
|---|---|---|---|
| | | नग (पोते) | वजन (किलो ग्रॅम) |
| | | | |
| | | | |

**<u>निविदेच्या अटी व शर्ती</u>**

१. निविदेत नमुद केलेला कापूसगाठीचा जुना आहे त्याच्या विक्री करीता निविदा मागवण्यात येत आहेत.

**२. निविदा अर्ज महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, फलटण येथे दि. ०५/०९/२०२५ ते ११/०९/२०२५ या कालावधीपर्यंत कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस धरून प्राप्त होतील.**

३. निविदा अर्ज टपालद्वारे/कुरीअरद्वारे पाठविण्यात येणार नाही.

४. निविदा सुस्पष्ट, ठळक व खाडाखोड नसलेली असावी, त्यात नमुद केलेली सर्व आवश्यक ती माहिती असणे गरजेचे आहे.

५. चुकीच्या निविदा भरल्यास अथवा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधित निविदेची बयाणा रक्कम जप्त करण्यात येउन सदर निविदेचा विचार करण्यात येणार नाही.

**६. जुना साठा वापर करण्याची कायदेशीर जबाबदारी विकत घेणा-याची राहील. साठवणुक साठा बरेच वर्षे पडून असल्याने त्याची प्रत खालावलेली असल्याने योग्य वापर करण्याची जबाबदारी निविदाधारकाची असेल.**

**७. वखार केंद्रावरील नमुद वखार पावतीवरील शिल्लक असलेल्या मालाचा जसा आहे, जेथे आहे या अटीवर वर्तमानपत्रातील जाहीरातीनुसार लिलाव करण्यात येत आहे.**

**८. सदर कापूसगाठींचे वजन हे साठवणुक दिनांकाचे असल्यामुळे त्यामध्ये तफावत येवू शकते, त्यामुळे कापूसगाठीच्या साठ्याची जावक प्रत्यक्ष वजना नुसार देण्यात येवून त्यानुसार अंतिम रक्कम आकारण्यात येईल.**

९. निविदा धारकाने जुन्या साठयाची विकत घेण्याची रक्कम आकडयात व अक्षरात नमुद करावी, यात तफावत, फरक असू नये.

**१०. निविदाधारकाने सर्व प्रकारचा जुना साठा एकाचवेळी एकत्रित उचलणे बंधनकारक राहील.**

**११. निविदाधारकाने साठा विकत घेण्यासाठी वजन, हमाली वाहतुक खर्च स्वत: करावयाचा आहे.**

१२. निविदा सादर करताना संबंधितांनी आकर्षित दर देणेत यावेत. सदर दरावर अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार महामंडळाकडे राहतील.

**१३. निविदा धारकाने निविदे सोबत रू. १०००००/- अक्षरी (रु. एक लाख रूपये फक्त) बयाणा रक्कम व निविदा अर्जाची फी रक्कम रू. १००००/- + GST (निविदा अर्जाची रक्कम ही कोणत्याही कारणास्तव परत दिली जाणार नाही.) म्हणून राष्ट्रीयकृत अथवा शेडयूल बँकेचा महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे नावे पुणे येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट सोबत जोडावा. बयाणा रक्कमेवर महामंडळ व्याज देणार नाही, तसेच लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर लगेच बयाणा रक्कम परत मिळणार नाही.**

**१४. कापूसगाठींच्या लिलावामधील अंतिम बोलीच्या रक्कमेवर सुरक्षा ठेव रक्कम १०% देणे बंधनकारक राहिल.**

**१५. निविदा समितीचा निर्णय प्राप्त झाल्यावर अथवा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचेकडून अंतिम निर्णय प्राप्त झाल्यानंतर वीस दिवसाच्या आत बयाणा रक्कम परत करण्यात येईल त्यावर व्याज देय असणार नाही.**

१६. जो निविदा धारक अपात्र ठरेल त्यांचे पोच घेऊन सदर मुळ डिमांड ड्राफ्ट ७ दिवसांच्या आत परत करणेत येईल.

१७. ज्या निविदा धारकांना लेखी आदेशाद्वारे माल उचल करण्याबाबत कळविण्यात येईल, त्यांनी मालाची उचल पूर्ण केल्यानंतर व व्यवहार पूर्ण झाल्यानंतर तसेच निविदा कराराचे पूर्ण पालन केलेले आहे याची शहानिशा केल्यानंतर बयाणा रक्कम परत करण्यात येईल किंवा समायोजित करणेत यईल. मालाची उचल करताना शेवटचे जावक वेळी संबंधीत वखार केंद्रावरून क्लिअरन्स सर्टिफिकेट प्राप्त करून घेण्याची जबाबदारी संबंधिताची राहील.

१८. ज्या निविदा धारकाची निविदा मंजुर केली जाईल, अशा निविदा धारकाला मालाची उचल करण्यापुर्वी मालाची किंमत RTGS/NEFT (लागू होणारे सर्व करासह) संबंधीत केंद्रावर महामंडळाच्या खात्यावर जमा करावी लागेल. सदर रकमेची शहानिशा झाल्यानंतर संबंधीत केंद्रप्रमुख साठयाची जावक देवू शकतील.

१९. पात्र निविदा धारकाने जुना साठा उचल करणे पुर्वी KYC कागदपत्रे उदा.पॅन कार्ड, आधार कार्ड इ. जमा करणे आवश्यक आहे.

२०. कापूसगाठींचा जुना साठा जावक पुर्वी पात्र निविदाधारकाने हमीपत्र ५०० रू च्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र/ प्रतिज्ञापत्र करून देणे बंधनकारक राहील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

| | |
|---|---|
| **नाव:-** | |
| **पत्ता :-** | |
| **फोन नं. :-** | |
| **ई-मेल:-** | |

**निविदा धारकाची स्वाक्षरी**

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ**
**(महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम)**
**वखार केंद्र - फलटण**
**फलटण — लोणंद रोड, तांबमाळ, फरांदवाडी, ता. फलटण जि. सातारा**
**Email id : phaltan.wh@mswc.in मो. ९०९६९७८९७०**

क्रमांक :

**दराचा तपशील**

| अ.क्र. | वखार केंद्राचे नाव | कापूसगाठींची संख्या | विकत घेण्याची किंमत | |
|---|---|---|---|---|
| | | प्रति किलो ग्रॅम | अंकी रु. | अक्षरी रु |
| | फलटण | | | |

उपरोक्त नमूद तक्तामधील वखार केंद्रावरील जुना कापूसगाठींचा साठा मी व्यक्तीश: पाहिला आहे. निविदेतील सर्व नियम व अटी मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत.

| | |
|---|---|
| **नाव:-** | |
| **पत्ता :-** | |
| **फोन नं. :-** | |
| **ई-मेल:-** | |

**निविदा धारकाची स्वाक्षरी**